**L. A. BILL No. VI OF 2023.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA POLICE ACT.

**सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६.**

**महाराष्ट्र पोलीस अधिनियम यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक २५ मार्च, २०२३ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानपरिषदेने दिनांक २५ मार्च, २०२३ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

१९५१ चा २२. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र पोलीस अधिनियमात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चौऱ्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

(शा.म.मु.) एचबी ३०१६—१ (१४५-३-२०२३)

संक्षिप्त नाव. **१.** या अधिनियमास, महाराष्ट्र पोलीस (सुधारणा) अधिनियम, २०२३, असे म्हणावे.

सन १९५१ चा अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम २ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र पोलीस अधिनियम (यात यापुढे, ज्याचा निर्देश, " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम २ मधील, खंड (६) मध्ये,— १९५१ चा २२.

(क) " " आयुक्त " " या मजकुरानंतर, " " विशेष आयुक्त " " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल आणि तो, दिनांक ४ जानेवारी २०२३ पासून समाविष्ट करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल ;

(ख) " पोलीस आयुक्त " या मजकुरानंतर, " विशेष पोलीस आयुक्त " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल आणि तो, दिनांक ४ जानेवारी २०२३ पासून समाविष्ट करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९५१ चा अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम ७ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७ मधील, खंड (अ) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल आणि तो, दिनांक ४ जानेवारी २०२३ पासून समाविष्ट करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल :—

" (अ-१) राज्य शासनास, बृहन्मुंबईकरिता विशेष पोलीस आयुक्त नेमता येईल.".

सन १९५१ चा अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम २५ ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम २५ मधील, पोट-कलम (२) मधील, खंड (अ) मध्ये, " अपर आयुक्त " या मजकुरानंतर ", विशेष आयुक्त " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल आणि तो, दिनांक ४ जानेवारी २०२३ पासून समाविष्ट करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल.

**५.** उद्देशिकेसह संपूर्ण मुख्य अधिनियमामध्ये, इंग्रजीमधील " ग्रेटर बॉम्बे " हा मजकूर ज्या ज्या ठिकाणी आला असेल त्या त्या ठिकाणी त्याऐवजी " बृहन्मुंबई " हा मजकूर, त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात येईल.

व्यावृत्ती. **६.** विशेष पोलीस आयुक्ताने, मुख्य अधिनियमाखालील त्याची कर्तव्ये पार पाडण्यासाठी, राज्य शासनाने कोणत्याही आदेशान्वये त्याला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करताना केलेली कोणतीही कृती किंवा कोणतीही कार्यवाही ही, महाराष्ट्र पोलीस (सुधारणा) अधिनियम, २०२३ याद्वारे सुधारणा केलेल्या मुख्य अधिनियमाच्या तरतुदींन्वये केलेली कृती किंवा यथास्थिति, कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल. २०२३ चा महा. .

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६.]**

**[ महाराष्ट्र पोलीस अधिनियम यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक. ]**

[**श्री. देवेंद्र फडणवीस,**
उप मुख्यमंत्री.]

[**विधानसभेने दिनांक २५ मार्च, २०२३ रोजी संमत केल्याप्रमाणे.**]

[**विधानपरिषदेने दिनांक २५ मार्च, २०२३ रोजी संमत केल्याप्रमाणे.**]

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई